# <u>प्रेसनोट दिनांक १६/०७/२०२२</u>

## <u>दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी</u>

## एटीएम फोडणारी टोळी २४ तासाच्या आतमध्ये अटक करून, त्यांचेकडुन एटीएम चोरीचे ०२ गुन्हे उघडकीस आणुन, <u>५,५०,०००/- रू ची रोख रक्कम व चारचाकी वाहन हस्तगत.</u>


| | | |
|---|---|---|
| | वरीष्ठ पोलीस निरीक्षक, | |
| | दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय | |
| | ई - मेल :- piantideco.pcpc-mh@gov.in | |
| | | |


दिनांक १४/०७/२०२२ रोजी पहाटेचे वेळेस मराठा क्रांती चौक, तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बँकेचे एटीएम मशिनमधील पैसे हे कोणीतरी अज्ञात चोरटयाने एटीएम मशिनचा पासवर्ड प्राप्त करून, त्यामधील ५,८२,५००/- रू रोख रक्कम चोरी केली व दिशाभुल करण्याच्या हेतुने, एटीएम मशिन ज्वलनशिल पदार्थाचा वापर करून नष्ट करण्याचा प्रयत्न केला याबाबत **तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३३७/२०२२ भा.द.वि. कलम ३३७/२०२२ भा.द.वि.कलम ४५७, ३८०, ४२७, ४३६, २०१, ३४** प्रमाणे गुन्हा नोंद झाला होता. त्या अनुषंगाने दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास इंगवले, पोलीस अधिकारी व अंमलदार असे गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, गुन्हयाबाबत सविस्तर माहिती घेवुन, वपोनि इंगवले यांनी पथकास गुन्हयाचे अनुषंगाने मार्गदर्शन व सुचना देवुन घटनास्थळाचे आजुबाजुचे परिसरातील सीसीटिव्ही फुटेजची तपासणी करणेबाबत आदेशीत केले. त्याप्रमाणे दरोडा विरोधी पथकाने सीसीटिव्ही फुटेजची तपासणी केली असता, तीन इसम सदर एटीएम सेंटर जवळ संशयीतरित्या फिरत असल्याचे दिसुन आले. तसेच सदर एटीएम मशीन मध्ये पैश्याची भरणा करणारी **सिक्युअर व्हॅल्यु इंडिया लि. कंपनीतील** इंजिनिअर व कामगार यांच्याकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी करीत असताना, तेथील पैसे भरणारा किरण महादे व पैसे भरणाऱ्या गाडीवर ड्रायव्हर म्हणुन काम करणारा योगेश वाळुंज यांच्या बोलण्यामध्ये असंग्धिता आढळुन आली. म्हणुन त्यांचेवरील संशय बळावला.

संशयीत इसम नामे १) **किरण रविद्र महादे**, वय २७ वर्षे, रा. सर्व्हे नं.६२, उमेश लॉन्ड्री, संगमवाडी, खडकी, पुणे २) **योगेश रामदास वाळुंज**, वय २९ वर्षे, धंदा- चालक, रा. घुडरेआळी, अंबिका धर्मशाळा, आळंदी, पुणे. यांना दरोडा विरोधी पथक कार्यालय, येथे आणुन त्यांच्याकडे सखोल व बारकाईने चौकशी करता, त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे इतर साथीदारांसह केल्याची कबुली दिल्याने, लागलीच दरोडा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी दाखल गुन्हयातील आरोपी नामे ३) **बाबासाहेब भोमाजी वाळुंज**, वय ३१ वर्षे, रा. काकणेवाडी, खोडावस्ती, ता.पारनेर, जि.अहमदनगर ४) **मुंजाजी मारोतराव चंदेल**, वय ३२ वर्षे, धंदा- ड्रायव्हर, रा. साई गॅलेक्सी अपार्टमेंटच्या बाजूला मेदनकरवाडी बालाजीनगर चाकण पुणे ५) **अशोक गजानन पोतदार** वय ३५ वर्षे,रा. सर्व्हे नंबर ४, समर्थनगर परांडे कॉलनी, मृनाल हॉटेलच्या मागे, दिघी पुणे ६) **भगवान अशोक थोरात,** वय २१ वर्षे, रा. अदिनाथ नगर, गव्हाणे वस्ती, वामनराव गार्डन जवळ, भोसरी पुणे यांना चाकण, पारनेर , अहमदनगर, आळंदी इत्यादी ठिकाणांहुन ताब्यात घेवुन,

त्यांच्याकडे एकत्रीत चौकशी करता, त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे इतर दोन **पाहिजे साथीदार नामे विकास रोकडे** रा. वडगाव सावताळ ता. पारनेर जि. अहमदनगर व **गणेश जेजुरकर** रा. मु.पो. टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर जि. अहमदनगर यांचेसह केल्याचे कबूली दिल्याने, त्यांना ताब्यात घेवुन, **तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३३७/२०२२ भा.द.वि. कलम ३३७/२०२२ भा.द.वि.कलम ४५७, ३८०, ४२७, ४३६, २०१, ३४** या गुन्हयाचे कामी तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे येथे हजर केले.

आरोपी **किरण रविद्र महादे**, **योगेश रामदास वाळुंज**, **अशोक गजानन पोतदार**, **भगवान अशोक थोरात** हे **सिक्युअर व्हॅल्यु इंडिया लि. कंपनी** तर्फे वेगवेगळया बँकेच्या एटीएम मशिन मध्ये पैसे भरण्याचे **(एटीएम ऑपरेटर)** काम करतात, त्यापैकी योगेश वाळुंज हा पैसे भरणाऱ्या वाहनावर ड्रायव्हर म्हणुन काम करतो. आरोपी किरण महादे व योगेश वाळुंज यांनी सुमारे दिड महिन्यापुर्वी एटीएम मशीन मध्ये पैसे भरल्यानंतर मशीनचे लॉक ओपन ठेवुन, रात्रीच्या वेळी सदर एटीएम मशीन मधील रोख रक्कम चोरी कण्याचे नियोजन केले होते. त्या नियोजनाप्रमाणे योगेश वाळुंज याने कंपनीमध्ये काम करणारे मित्र व त्याचे गावाकडील मित्र असे बोलुावन त्यांना नियोजना मध्ये सामील करून घेवुन, त्यांनी नियोजन केल्या प्रमाणे दिनांक १४/०७/२०२२ रोजी पहाटेच्या वेळी मराठा क्रांती चौक, तळेगाव दाभाडे येथील एचडीएफसी बँकेचे एटीएम मशिनमधील पैसे चोरी करून, एटीएम मशीला गॅस कटर व पेट्रोलचे सहायाने आग लावुन मशीन जळाल्याचा बनाव केला होता असे तपासात निष्पन्न झाले आहे. नमुद आरोपींकडुन गुन्हयामध्ये चोरीस गेलेल्या **रोख रकमेपैकी २,००,०००/- रुपये रोख व गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली किं.रु.३,५०,०००/- रु.किं ची स्विफ्ट डिझायर कार असा एकुण ५,५०,०००/- रुपये** किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

वर नमुद आरोपींपैकी आरोपी नामे **योगेश वाळुंज व बाळासाहेब वाळुंज** यांचेकडें केलेल्या चौकशी मध्ये त्यांनी सुमारे एक वर्षापुर्वी आळेफाटा पोलीस स्टेशन चे हददीमध्ये बँक ऑफ महाराष्ट्र चे ए टी एम मशीन फोडण्याचा प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत **आळेफाटा पोलीस स्टेशन गु.र.नं. ३८७/२०२१ भादविक ४५७, ३८०, ५११, ३४** अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले, सपोनि सिध्देश्वर कैलासे, पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार गणेश सावंत, सुमित देवकर, समीर रासकर, विनोद वीर, अमर कदम, गणेश हिंगे, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, प्रविण कांबळे, राहुल खारगे, राजेंद्र शिंदे, आशिष बनकर, सागर शेडगे, गणेश कोकणे, राजेश कौशल्ये, औदुंबर रोंगे, गोविंद सुपे, प्रविण माने, दत्तात्रय बनसोडे, शामसुदंर गुट्टे, धनंजय भोसले, दयानंद खेडकर, नागेश माळी, राजेंद्र शेटे यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**